# इच्छा शक्ती

आपण आपल्या जीवनात एक इच्छातर निश्चितच ठेवतो आणि ती म्हणजे यश किंवा सफलता संसारिक समृद्धी किंवा आध्यामिक उपलब्धीसाठी कोणासही पराजित होण मान्य नाही. आपण सर्व विजेते होण्यास उत्सुक असतो. सर्वजण सफल होण्यास उत्सुक असतात. आपण जीवनाच्या क्षेत्रामध्ये मात्र बघतो कि केवळ मुठभर मनुष्यच यशस्वी होतात. अधिकतर मनुष्यांच्या हाती फक्त अपयशच येते.

मनुष्याच्या यश आणि अपयशाच्या गाथांमध्ये विविध प्रकारच्या तत्तांचे योगदान असते. परंतु सर्वच गोष्टीमध्ये एक समान कारण उपस्थित असते. आणि ते म्हणजे इच्छाशक्ती एखादद्याच्या जीवनामध्ये सफलतेचा परिणाम त्याच्या इच्छाशक्तीच्या विकासानेच शक्य होतो. आणि म्हणूनच प्रत्येक मनुष्याच्या जीवनाचा सर्वात जास्त महत्त्वपूर्ण प्रश्न हा असतो की, आपल्या इच्छाशक्तीचा विकास कसा करावा? इच्छा शक्तीचा विकास आपल्या बालपणापासूनच आपल्या शिक्षणचा एक भाग असणे अत्यंत आवश्यक आहे कारण त्याच्या अभावामुळेच आपण खुप मागे राहुन जातो. इच्छाशक्ती असेल तर मनुष्य शून्यापासून त्यांची सृष्टि तयार करु शकतो आणि इच्छाशक्तीच्या अभावी सारी प्रतिभा आणि योग्यता निरर्थक ठरते.

**काय आहे इच्छाशक्ती? -** या सृष्टीच्या तत्वांना स्वीकार करा अथवा नका करु परंतु एक गोष्ट याच्यातून निघते आणि ती आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये रचनात्मक प्रयत्नांच्या मागे इच्छाशक्तीच आहे. आणि तिचा उगम कोठून होतो. स्वामी विवेकानंद म्हणतात इच्छशक्ती आणि मनाचे मिश्रण आहे ही इच्छाशक्ती चरित्रापासून उत्पन्न होते आणि चरित्र कर्मापासून निश्चित होते. यासाठी जसे कर्म असतात. इच्छाशक्तीची अभिव्यक्तीपण तशीच होते. आपले ध्येय निश्चित करुन ते प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करत राहणे म्हणजेच इच्छाशक्ती होय.

कल्पना करा की, कोलम्बसच्या वेळी अमेरिकेची बरोबर त्यांची तुलना करा. हे मोठे आश्चर्यजनक बदल मानवाच्या इच्छाशक्तीद्वारा शक्य होऊ शकले. जगामध्ये परिवर्तन होणाऱ्या सर्व क्रिया आणि प्रतिक्रिया आणि प्राप्ती माणसाच्या इच्छाच्या रुपाने आहे.

मानवाच्या ज्या चांगुलपणावर आपण गर्वकरतो. किंवा दुः ख व्यक्त करतो किंवा विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये ज्या गोष्टी आश्चर्य व्यक्त करतात त्या सर्व माणसाच्या इच्छाशक्तीची देणगी आहे. विजय प्राप्त करण्याची प्रेरणा किंवा लक्ष्य प्राप्त करण्यासाठी दृढ इच्छा शक्तीच काम करते.

नेपोलियनने लिहून ठेवले आहे की, माणूस जो विचार करतो आणि त्या गोंष्टीबद्दल समजाते तो ती गोष्ट मिळवतो. सर्व प्राप्ती करण्यासाठी दृढ इच्छा आवश्यक असते. ज्याप्रमाणे थोडी उष्णता जास्त ऊब देऊ शकत नाही. त्याचप्रमाणे कमी इच्छा शक्तीविजय प्राप्त करुन देऊ शकत नाही.

जीवनामध्ये यश मिळवायचे असेल तर इच्छा शक्ती हेच ब्रम्हास्त्र आहे. मानवाने स्वतः च निर्धार करायला पाहिजे की, त्याच्यामध्ये ज्या शक्ती आहे त्या व्यावहारिक स्वरुपामध्ये व्याप्त असलेल्या वाईट कृत्यांना कायमची तिलांजली देण्यात वापरायला हव्यात.

**- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स**

**www.bkvarta.com**